पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/९/कावि/ १५० /२०१५
दिनांक : ११ /०५/२०१५

प्रति,

मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०५/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे - २०१५ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दिनांक २०/०५/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>**

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**<u>कार्यपत्रिका क्रमांक ४४</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे - २०१५ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दिनांक २०/०५/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

------

मा.महापालिका सभा क्रमांक - ३९ दिनांक २०/१/२०१५, २७/१/२०१५, १०/२/२०१५ (दु.१.०० व १.२५) २०/२/२०१५ व २६/२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

----------

**<u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १)** संदर्भ :-१) मा.सुनिता वाघेरे, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१००८७ दिनांक २३/१२/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ६२८ दि.१०/२/२०१५

नमूद केलेल्या व्यक्तींना घरगुती वापरासाठी एक नळ कनेक्शन हद्दीबाहेर से.२३ आशीर्वाद कॉलनी अप्पू घर शेजारी, निगडी, पुणे येथे देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| १) श्री. गणेश श्रीपती लिमये, | २) अरुंधती गणेश लिमये, |
| ३) सुरेश के. शर्मा, | ४) नरेश शर्मा |
| ५) श्री. लगड | ६) श्री.पाटील |

**(टिप- माहे मे-२०१५ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

**विषय क्रमांक २)** संदर्भ :- १) मा.बाळासाहेब तरस, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०२५५ दिनांक ३०/१२/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ६३१ दि.१०/२/२०१५

मनपा हद्दीलगत असलेले गहुंजे येथील साईनगरमधील वाघजाई सोसायटी, श्री हरीदर्शन सोसायटी व संकेत विहार येथील भागातील नागरिकांस मनपातर्फे पिण्याचे पाणी पुरवठा करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**(टिप- माहे मे-२०१५ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

**विषय क्रमांक ३)** संदर्भ :- १) मा.विनायक गायकवाड, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११३९० दिनांक २८/४/२०१५

कु.नुपूर लक्ष्मण मोरे हिला थायलंड येथील पाचव्या योगा चॅम्पियनशीप स्पर्धेस उपस्थित रहाणेकामी र.रु.७०,०००/- अर्थसहाय्य मंजूर करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

--------

## <u>मा.शहर सुधारणा समितीचे ठराव</u>

**विषय क्रमांक ४)** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१४/०८/२०१५, दिनांक - १०/०३/२०१५
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४८ दि.६/५/२०१५

मौजे औंध येथील राजीव गांधी उड्डाण पुलापासून ते मौजे ताथवडे-पुनावळे हद्दीपर्यंत ४५.०० मी. रुंद रस्ता विकास योजनेमध्ये प्रस्तावित असून सध्या जागेवर ४५.०० मी. रुंद रस्ता विकसित झालेला आहे. वाहतूक व दळणवळणाच्या नियोजनाकरीता ताथवडे - पुनावळे हद्दीपासून रावेत ते मुकाई चौक किवळे मुंबई - पुणे हायवे पर्यंत ४५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेबाबत स्थापत्य विभागाने मागणी केलेली आहे. या प्रस्तावाचे अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित रस्ता रुंदी खालीलप्रमाणे आहे. १) ताथवडे पुनावळे हद्दीपासून पुनावळे रावेत पुलापर्यंत रस्ता रुंदी- ३०.०० मी. २) रावेत हद्दीपासून ते किवळे हद्दीपर्यंत रस्तारुंदी ३०.०० मी. व ३४.५० मी. ३) किवळे हद्दीपासून ते मुंबई पुणे हायवे पर्यंत रस्तारुंदी - ३०.०० मी. रावेत पुलापासून ते रावेत गावठाण हद्दीपर्यंत

रस्तारुंदी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेनुसार ३४.५० मी. रस्तारुंदी प्रस्तावित केलेली आहे. स्थापत्य विभागाने केलेल्या मागणीनुसार वाहतुकीच्या दृष्टीकोनातून उक्त रस्त्याची रुंदी ४५.०० मी. करणे. भविष्यात होणा-या वाहतूकीच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. मंजूर विकास योजनेतील रस्तारुंदी वर उल्लेख केल्यानुसार ४५.०० मी. रुंद करण्याकरिता म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव सुरु करण्यास आणि सदर फेरबदल प्रस्तावावर प्राप्त हरकतधारकांना सुनावणी देऊन व त्यावर निर्णय घेऊन शासनास अहवाल सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सांगवी किवळे या बी.आर.टी. मार्गाचे महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये सलग ४५.०० मी. रुंदीच्या रस्त्याचे आरक्षण करणेबाबत सदर ठरावात अंतर्भूत आहे. सदर ठरावात नमुद स्थापत्य विभागाने मागणी केलेल्या सांगवी-किवळे या बी.आर.टी. मार्गापैकी प्रत्यक्ष मार्गाचा विचार करता सदरच्या रस्त्यापैकी ४५.०० मी. रुंद रस्त्याची मुकाई चौक, किवळे येथपर्यंतच आवश्यकता दिसून येते कारण की, १) मुकाई चौकापासून पूर्व व पश्चिम दिशेस ४५.०० मी. रस्ते प्रस्तावित आहेत. २) मुकाई चौकात बी.आर.टी. स्टेशन प्रस्तावित आहे. ३) वाहतूकीचा विचार करता सदर रस्त्याची रुंदी प्रस्तावित करणेबाबत नमूद आहे. तथापि सदरची वाहतूक मुंबई पुणे हायवे ते मुकाई चौक या दरम्यान एकाच दिशेने जास्त होईल असे दिसून येते. ४) सदरील रस्त्याने बाधित होणा-या शेतक-यांचीच अन्य आरक्षणासाठीही जागा बाधीत होत आहे. सबब सदर शेतक-यांवर अन्याय होत आहे. वरील कारणांचा विचार करता सांगवी-किवळे या बी.आर.टी. मार्गापैकी मुकाई चौक ते मुंबई-पुणे हायवे पर्यंतची प्रस्तावित रस्ता रुंदी ४५.०० मी. ऐवजी ३०.०० मी. ठेवणेस मान्यता देणेकामी मा.महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ५)** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/तळवडे/२२/२०१५, दि.०९/०४/२०१५

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४९ दि.६/५/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेत मौजे तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आलेला आहे. सदर विकास योजनेच्या रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला असून सदर प्रकरणी प्रथम टप्प्यातील ५२.० ते ६०.० मी. रुंद रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक क्रमांक १ पिंपरी यांचे कार्यालयात सुरु आहे. सदर ९०.०० मी. रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकाकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटर ऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याबाबत स्पाईन रस्त्याचे आखणीबाबत नियुक्त समितीने अंतिम केलेल्या आखणीनुसार / सुचविलेनुसारची प्रस्तावित ७५.०० मी. रस्त्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु आहे. सदर फेर बदलाची प्रस्तावा सोबतच्या नकाशात दर्शविलेप्रमाणे

७५.०० मी.रुंद प्रस्तावित रस्त्याच्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेचे व तद्अनुषंगाने येणारा खर्च करणेचे अधिकार मा.आयुक्तांना देणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ६)** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१३/३५/२०१५, दि.१०/०४/२०१५
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५० दि.६/५/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.-७९५/०५/नवि-१३, दिनांक - ३०/०५/०८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८०८/८९४/सी आर-१७२७/०९/नवि-१३, दिनांक - १८/०८/०९ अन्वये भागश: मंजुर विकास योजनेतील विषयांकित मिळकतीमधून जाणारा ३०.० मी. रुंद रस्ता व २४.० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. मौजे च-होली येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने विषयांकित मिळकतीमधील ३०.० मी. रुंद रस्ता (जूना स.नं. ४५८ पै., ४५९ पै., ४६२ पै., ३८३ पै., ३६३ पै.,) व २४.० मी. रुंद रस्ता (जूना स.नं. ४६२ पै., ४५८ पै., ४६३ पै., ४६४ पै.,) ( पूर्व-पश्चिम रस्ते विकसित करणे आवश्यक आहे.) रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकांचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. विषयांकित जमिनीचे प्रचलित भुसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी विषयांकित रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ७)** संदर्भ - १) मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.५१ दि.६/५/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सन २०१२ पासून बी.आर.टी.एस. प्रकल्प राबविण्यात आला आहे व आज रोजी सन २०१३-२०१४ मध्ये नाशिक फाटा ते वाकड व औंध किवळे हे बी.आर.टी.एस. चालू करण्यात आले. पिंपळे गुरव सनं.८४ व ८५ मध्ये बी.आर.टी.एस. बाधित लोकांनी स्वत:चे घर स्वत: काढून घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगररचना विभागाला व बीआर.टी.एस.विभागाला ताबा दिलेला असून ज्या नागरिकांनी घरकुल मिळविण्याकरीता अर्ज करुन देखील व आरक्षणामध्ये घरकुल शिल्लक असताना घरकुल मिळत नाही. या प्रकल्पाचा सर्वे झाला असताना सन २००६ ते २००७ मध्ये नागरिकांनी स्वत:चे कुटूंबाचे संरक्षणासाठी छोटीशी दुबार मिळकत घेतल्यामुळे १००% (शंभर टक्के) जागा व घर रस्त्यात जाऊन देखील दूबार प्रॉपर्टीमुळे नागरिकांना आरक्षणामध्ये घरकुल शिल्लक असताना घरकुल मिळत नाही काळेवाडी बी.आर.टी.एस.रोड सर्वे नं.८० ते ९९ या सर्वे नं.मध्ये वरील प्रमाणे बी.आर.टी.एस. रोड बाधीत व दुबार प्रापर्टी असणारे नागरिक आहेत. तरी पिंपरी चिंचवड शहरातील बीआर.टी.एस. बाधीत व दुबार प्रॉपर्टी धारकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनामार्फत ईडब्लू.एस. मधील २५७ मधील आरक्षण मधून घरकुल देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

--------

## समित्यांचे अहवाल

### मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ८)** अ) दि. २५/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. ८/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक ९)** अ) दि.१८/३/२०१५ व २५/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. १/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

### मा.क्रिडा समिती

**विषय क्रमांक १०)** अ) दि. १/४/२०१५ व दि.६/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. १५/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

### मा.फ प्रभाग समितीचे ठराव

**विषय क्रमांक ११)** संदर्भ - १) मा.सुलभा उबाळे व मा.संगीता पवार यांचा दि. ८/४/२०१५ चा प्रस्ताव.
२) मा.फ प्रभाग समितीकडील ठ.क्र.६४ दि.८/४/२०१५
३) मा.प्रशासन अधिकारी फ क्षेत्रीय कार्यालय यांचे पत्र क्र.फक्षेका/सभा/कावि/५६/२०१५ दि.८/४/२०१५

विषय - प्रभाग क्र. ११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल येथे स्व. मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाऐवजी मा.शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे क्रीडा विकास संस्थेच्या खर्चाने उभारण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रभाग क्र. ११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे स्व. मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाऐवजी मा.शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार

ठाकरे विकास संस्थेच्या खर्चाने उभारणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी पाठविणेत येत आहे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/९/कावि/१५०/२०१५
दिनांक : ११/०५/२०१५

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.